# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील नेरळ व ममदापूर ग्रामपंचायतीने अनधिकृतपणे गृह प्रकल्पास पाणी पुरवठा केल्याबाबत

**(१) ११५०८ (०८-०९-२०२०). श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील ममदापूर ग्रामपंचायत हद्दित नेरळच्या पाणी पुरवठा पाईपलाईन मधून पाणी पुरवठा सुरु असून पाण्याची टंचाई असल्याने सद्या केवळ ग्रामस्थांच्या पाण्याच्या मागणीला प्राधान्य देऊन गृह प्रकल्पाला (बिल्डर लॉबीला) पाणी पुरवठा न करण्याचा निर्णय नेरळ व ममदापूर ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांनी माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान ठराव केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठराव केलेला असतांनाही बांधकाम व्यावसायीकांशी आर्थिक व्यवहार करून ग्रामपंचायत गृह प्रकल्पास परस्पर पाणी पुरवठा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कारवाई करण्यासह नेरळ व ममदापूर गावात पाणी टंचाई निर्माण होवू नये यासाठी उपाययोजना करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही .
(२) प्रश्न उद्भवत नाही .
(३) प्रश्न उद्भवत नाही .
( ४ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात ५ पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रामपंचायतीमध्ये केलेल्या सोयी-सुविधांबाबत

**(२) १२१८१ (०९-०९-२०२०). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात एकूण ९३ ग्रामपंचायतीच्या नमुन्यात ८८ ग्रामपंचायतीला हिरवे कार्ड व ५ ग्रामपंचायतीला पिवळे कार्ड देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिमूर तालुक्यात ५ पिवळे कार्ड मिळालेल्या ग्रामपंचायतीमध्ये पिण्यायोग्य पाण्याची सोय करण्यासाठी शासनाने काही सोयी-सुविधा केल्या आहेत काय,
(३) असल्यास,उक्त सोयी-सुविधा व उपाययोजनेचे तपशील व त्यावरील येणारा आर्थिक खर्च काय आहे ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) चिमूर तालुक्यातील पाण्याचा नमुना सर्वेक्षण (एप्रिल-२०२०) अंतर्गत मौजा जांभुळविहिरी, खडसंगी, पिपर्डा, मासळ बु. व उरकुडपार या पाच गावांना पिवळे कार्ड देण्यात आलेले होते. ह्या ५ गावामध्ये पिण्याच्या पाण्याकरीता नळ पाणी पुरवठा योजना अस्तित्वात असून योजनेद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा केला जातो तसेच मौजा

खडसंगी व मौजा मासळ बु. येथे जल शुध्दीकरण सयंत्र (R.O.) द्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. संबंधित ग्राम पंचायतीकडून हातपंप व विहिरी यांच्या आजूबाजूचा केरकचरा व सांडपाणी यांची विल्हेवाट लावून स्वच्छता केलेली आहे. वरील गावातील पिण्याच्या पाण्याकरीता उपलब्ध नळ पाणी पुरवठा योजना, सार्वजनिक हातपंप व सार्वजनिक विहीरी यावरील देखभाल दुरुस्ती व स्वच्छता याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीवर आहे.

---

### राज्य शासनाची डेक्कन ओडिसी ट्रेन सुरु करण्याबाबत

**(३) ३३१०९ (१२-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटन उद्योगातला ऑस्कर मानला जाणारा म्हणजे वर्ल्ड ट्रॅव्हल अ‍ॅवॉर्ड सलग पाचवेळा पटकावणारी आलिशान ट्रेन डेक्कन ओडिसी सन २०१८ पासून कारशेडमध्ये पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रेन कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२८-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

डेक्कन ओडिसी ही ट्रेन माहे ऑक्टोबर, २०१४ पासून ५ + ५ अशी एकूण १० वर्ष चालविण्याकरीता मे. कॉक्स ॲण्ड किंग्स लि. या कंपनीस चालविण्याकरीता देण्यात आली होती.

मे. कॉक्स ॲण्ड किंग्स लि. यांच्याकडून दि.०७.०३.२०२० ते दि.१४.०३.२०२० या कालावधीकरीता डेक्कन ओडिसी चालविण्यात आली होती. कोव्हिड-२०१९ मुळे डेक्कन ओडिसीच्या सहली २०२२-२३ पर्यंत पूर्णपणे थांबविण्यात आल्या होत्या.

सध्या डेक्कन ओडिसी ट्रेन चालविण्याकरीता निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. इबिक्स ट्रॅव्हल्स यांची निवड करण्यात आली असून त्यांचेसमवेत करार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर डेक्कन ओडिसी ट्रेन कार्यान्वित करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हा परिषद, आरोग्य विभागामध्ये विविध पदांसाठी भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(४) ३४८६० (१०-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषद, आरोग्य विभागामध्ये विविध पदांसाठी झालेल्या भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाला असून याबाबतच्या चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले,

(३) असलास, त्यानुसार संबधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०६-२०२३) :** (१) होय, चौकशी पुर्ण झालेली आहे.

(२) श्री. वैभव खुजे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक व श्री. विजय सोनोने कार्यक्रम सहाय्यक हे दोन एन.एच.एम. कंत्राटी अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून आले.

(३) १. श्री. वैभव खुजे यांची नियुक्ती मा. आयुक्त एन.एच.एम. कार्यालय मुंबई यांच्या मार्फत करण्यात आलेली होती. श्री. खुजे यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा परस्पर आयुक्त एन.एच.एम. मुंबई यांच्या कार्यालयास दि.१६.११.२०२१ रोजी सादर केला होता, त्यानुसार आयुक्त एन.एच.एम. कार्यालय, मुंबई यांनी त्यांचा राजीनामा मंजुर केला.

२. श्री. विजय सोनोने कार्यक्रम सहाय्यक हे कंत्राटी कर्मचारी असल्यामुळे यांना पुढील पुर्ननियुक्ती देण्यात आलेली नाही. सद्यस्थितीत सदर दोन्ही दोषी कंत्राटी कर्मचारी यांना पुर्ननियुक्त केले नसल्याने ते सेवेत नाहीत.

(४) राबविण्यात आलेल्या पदभरती प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली, त्यानुसार पुढे सदर भरती रद्द करण्यात येऊन सर्व रिक्त पदांची नव्याने भरती निवड प्रक्रिया अंतिम टप्यात आहे.

---

## आरमोरी व कुरखेडा, (जि. गडचिरोली) येथे पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करण्याबाबत

**(५) ३५१९५ (०७-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी व कुरखेडा (जि.गडचिरोली) येथील पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारती जुन्या व मोडकळीस झाल्या असल्याने अधिकारी, कर्मचारी यांच्यासह नागरीकांची प्रचंड गैरसोई होत असल्याचे माहे आक्टोंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा परिषद गडचिरोली यांनी आरमोरी व कुरखेडा येथे सर्व सुविधायुक्त पंचायत समिती व नविन प्रशासकीय इमारत बांधकामाचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त इमारतीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले ,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणी त्वरीत नविन प्रशासकीय इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती, आरमोरी व कुरखेडा (जि. गडचिरोली) येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) शहर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत

**(६) ३५८९५ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहर ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक शहर म्हणून प्रसिध्द असून येथे योगेश्वरी देवीचे मंदिर, आद्यकवी संत मुकुंदराजस्वामी समाधी, संत दासोपंत समाधी, डोंगरकपाऱ्यातील बुट्टेनाथ मंदिर, किरमानी दर्गा, मौलाली दर्गा, हतीखाना, बाराखाबी मंदिर लेणी, आकर्षक मुर्त्या असलेले सकलेश्वर मंदिर, जैन लेण्या तसेच अंबाजोगाई निसर्गरम्य परिसरात पशुपक्ष्यांच्या व झाडांच्या विविध प्रजाती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शहराच्या बाजूला असलेल्या डोंगरातील निसर्ग पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी रस्ते, पूल, राहण्याची व्यवस्था नसणे, त्यामुळे ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा असलेल्या अंबाजोगाई या शहराला पर्यटन केंद्र म्हणून विकसित करणे आवश्यक असल्याने यासाठी आराखडा करून मंजूरी व निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यटन मंत्री यांच्याकडे दिनांक ३१/०३/२०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२३-०६-२०२३) :**(१) होय

(२) होय

(३) याबाबबत पर्यटन संचानलायकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ग्रामसेवकाने दिशाभुल करणारा अहवाल सादर केल्याबाबत

**(७) ३८२३६ (०७-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४(१)(ह) अन्वये श्री. रामेश्वर रामचंद्र साठवणे विरूध्द श्रीमती अनुसया अर्जुन खंडाते व इतर ही प्रकरणे सुरू असून ग्रा.पं. मांगली (तेली) (ता. मौदा, जि. नागपूर) येथील ग्रामसेवकाने अपर जिल्हाधिकाऱ्यास दिशाभुल करणारा अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पंचायत समिती, मौदा (जि. नागपूर) येथील गट विकास अधिकारी केलेल्या चौकशीत ग्रामसेवकाने कर्तव्यात कसुर केल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी ग्रामसेवकाने दिशाभुल करणारा अहवाल सादर केल्याबाबत तसेच कर्तव्यात कसुर केल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तूत प्रकरणातील दोषी ग्रामसेवकावर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ५ नुसार कारवाई करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४ (एक) अन्वये कार्यालयीन कामकाजात अनियमितता केल्याबाबत ठपका ठेवणे ही अंतिम शिक्षा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शहापूर तालुक्यातील ( जि. ठाणे ) पंचायत समिती हद्दीतील ग्रामपंचायत आणि पंचायती समितीमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) ३८६२२ (०७-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील ( जि. ठाणे ) पंचायत समितीमध्ये १३० हून अधिक पदे रिक्त असून सहा कर्मचारी प्रतिनियुक्तीवर असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पंचायत समिती हद्दीत एकूण ११० ग्रामपंचायती येत असून मंजूर ०२ हजार ३३० पदांपैकी २०१ पदे मागील काही वर्षांपासून रिक्त असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त ठिकाणची रिक्त पदे विनाविलंब भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०६-२०२३) :** (१) होय.

(२) जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत शहापूर तालुक्यात एकूण ११० ग्रामपंचायती असून सदर ग्रामपंचायती अंतर्गत आकृतीबंधानुसार एकूण २५१ पदे मंजूर आहेत त्यापैकी १९१ पदे भरलेली आहेत व ६० पदे रिक्त आहेत.

(३) वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. १४.०१.२०१६ नुसार गट-ड ची २५ टक्के पदे निरसित करण्याबाबत सूचना तसेच सेवा निवृत्ती, मयत झाल्याने तसेच लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता तसेच त्यानंतर महापोर्टल रद्द झाल्याने सदरची पदभरती होऊ शकली नाही.

त्यानंतर कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाच्या दिनांक ४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले होते.

(४) तथापि, उपरोक्त संवर्गातील एकूण रिक्त पदांच्या ८०% रिक्त पदे भरण्याकरिता ग्रामविकास विभागाच्या दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा परिषदेने सन २०१७-१८ मध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून निवासस्थान शुल्क व सेवाशुल्क वसुल केले नसल्याबाबत**

**(९) ३९३८९ (०७-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परिषदेने सन २०१७-१८ मध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून निवासस्थान शुल्क व सेवाशुल्क वसूल केले नसल्याची ही बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी सेवा शुल्क वसुली करणे आवश्यक असताना रु. ५,५२,६५१/- ची वसुली केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) सन २०१७-१८ स्थानिक निधी लेखा परिक्षण मध्ये अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून निवासस्थान व सेवा शुल्क वसूल न केल्याबाबत परिच्छेद घेण्यात आला होता. यामध्ये निवासस्थान शुल्क व सेवाशुल्क रक्कम रु. ५,५२,६५१/- दर्शविली होती.

(२) , (३) व (४) सदर प्रकरणी लेखा परिच्छेद मधील रक्कम रु. ५,५२,६५१/- पैकी रु. ३,१३,६५६/- इतकी रक्कम संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी वसुल करून सेस फंडामध्ये भरणा केली आहे. उर्वरित रक्कम रु. २,३८,९९५/- इतके निवासस्थान शुल्क व सेवा शुल्क वसुल करण्याबबात संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना जिल्हास्तरावरून सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**पंचायत समितीमधील ( जि. सांगली) अनेक विभागामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(१०) ३९८३९ (०१-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :**सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर व आटपाडी पंचायत समितीमधील ( जि. सांगली) अनेक विभागामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदृअनुषंगाने सदरील रिक्त पदे रिक्त तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत खानापूर पंचायत समिती, विटा येथे माहे जानेवारी-२०२२ मध्ये अधिकाऱ्यांची एकुण १५ मंजुर पदांपैकी ११ पदे कार्यरत असुन ४ पदे रिक्त आहेत. तसेच कर्मचाऱ्यांची एकुण ६८७ मंजूर पदांपैकी ५३४ पदे कार्यरत असुन १५३ पदे रिक्त आहेत.

तसेच पंचायत समिती, आटपाडी येथे माहे जानेवारी, २०२२ मध्ये अधिकाऱ्यांची एकुण २३ मंजूर पदांपैकी ११ पदे कार्यरत असुन १२ पदे रिक्त आहेत. तसेच कर्मचाऱ्यांची एकूण ८२० मंजूर पदांपैकी ६७५ पदे कार्यरत असुन १४५ पदे रिक्त आहेत.

ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदे अंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर विभागातील संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या अनुक्रमे दि. २१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला होता. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस./ आ.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावर आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. तदनंतर Application Portal विकसित करून लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकाना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वाशित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(११) ४०४८५ (०९-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा येथील परिषद शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना सुधारीत सेवा अंतर्गत आश्वाशित प्रगती योजनेचा लाभ देण्यात येतो मात्र सर्व शिक्षकाना याचा लाभ अद्याप मिळत नसल्याने अनेक शिक्षक या लाभापासून वंचित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांना उपरोक्त लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) :** (१ ) नाही.

(२) " ज्यावेळी केंद्र शासनामार्फत शिक्षक संवर्गास प्रा. चट्टोपाध्याय आयोगाऐवजी अन्य आयोग स्थापन होऊन त्यांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय केले जातील त्यावेळी राज्यातील शिक्षकांना सदर लाभ अनुज्ञेय करणे योग्य राहील. सद्य:स्थितीत प्रा.चट्टोपाध्याय आयोगानुसारच शिक्षक संवर्गास वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी अनुज्ञेय आहे."

(३ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबोडा (ता.महागांव, जि.यवतमाळ) ग्रामपंचायत हद्दीत विनापरवाना वृक्षतोड केल्याबाबत**

**(१२) ४०५६४ (०७-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबोडा (ता.महागांव, जि.यवतमाळ) ग्रामपंचायत सरपंच, सचिव, सदस्य यांच्या तोंडी आदेशाने ग्रामपंचायत हद्दीतील ३५ वर्ष जुनी असलेली कुडुलिंबांच्या झाडांची विनापरवाना वृक्षतोड केली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विनापरवाना वृक्षतोड करणाऱ्या संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
कडूलिंबाचे झाड हे पाणीपुरवठा विहिरीजवळ असल्यामुळे, झाडाची पाने फुले विहिरीच्या पाण्यात पडत असल्यामुळे तसेच झाडावरील पशुपक्षांची विष्ठा सुध्दा पाण्यात पडत असल्याने विहिरीतील पाणी दुषित होत असून रोगराईचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत मंजुरी घेऊन सदर झाड पाडण्यात आले आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सरपंच/सचिव यांना भविष्यात विना परवानगी कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करण्यात येऊ नये अशी सक्त ताकीद देण्यात आली आहे.
(३ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) घरकुलांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(१३) ४०७३२ (०६-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रधानमंत्री आवास योजना व अन्य योजनेतून ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी केवळ १ लक्ष ३० हजार रुपये अनुदान उपलब्ध करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलांना शहरी भागात २ लाख ५० हजार रुपये तर ग्रामीण भागात १ लाख ४० हजार रुपये अनुदान दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुदानात दुजाभाव होत असून शहरी भागाला जास्त फायदा व ग्रामीण भाग जास्तीच्या अनुदानापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बांधकाम साहीत्य, मजूरी यांच्या वाढलेल्या दरामुळे प्राप्त अनुदानात घरकुलांचे बांधकाम करण्यास लाभार्थ्यांना अडचणी निर्माण झाल्याने घरकुलांची कामे अपूर्ण राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदूनुसार राज्यातील उक्त योजनेअंतर्गत लाभार्थांना घरकुल बांधकामासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व अन्य योजनांतर्गत घरकुल बांधकामासाठी ग्रामीण भागातील साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष व डोंगराळ/नक्षलग्रस्त भागात रु.१.३० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
(२) प्रधानमंत्री आवास योजना - शहरी योजनेंतर्गत घरकुल बांधकामासाठी रु.२.५० लक्ष एवढे प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व अन्य योजनांतर्गत घरकुल बांधकामासाठी वरीलप्रमाणे अनुदान दिले जाते.
(३) सदरची योजना केंद्रपुरस्कृत असून सदर योजनेसाठी केंद्र शासनाने अर्थसहाय्य निश्चित केले आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत रु.१.२० लाख अनुज्ञेय अनुदानाची रक्कम वाढवून ती प्रधानमंत्री आवास योजना-शहरीच्या धर्तीवर रु.२.५० लाख करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.२५/११/२०२० च्या पत्रान्वये सादर केला होता. तथापि, केंद्र शासनाने दि.०२/१२/२०२० च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव नामंजूर केला आहे. तदनंतर सुध्दा दि.०१/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुन:श्च केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कर्ले ते सतारे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या रस्त्याच्या कामाबाबत

**(१४) ४१८७८ (०१-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कर्ले ते सतारे (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या रस्त्याचे काम १२ वर्षापूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आले होते, त्यानंतर सदर रस्त्यावर कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही तसेच स्त्यावर वाहने चालविण्यास नाहक त्रास होत असल्याने दोन्ही गावांच्या ग्रामस्थांनी सदरील रस्त्याचे काम नवीन करण्याबाबतची मागणी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू रस्त्याचे काम त्वरीत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे कर्ले ते सतारे या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत दिनांक १५.०५.२००८ रोजी पूर्ण करण्यात आले असून सदर रस्त्याची दुरुस्ती सन २०१६ मध्ये विशेष दुरुस्ती योजनेंतर्गत करण्यात आली आहे.

(२) धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील मौजे कर्ले ते सतारे रस्ता इजिमा क्र.४९ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ७ कि.मी. एवढी आहे.

सदर रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/०० लांबीमध्ये पाईप मोरी बांधण्याकरीता लेखाशिर्ष ५०५४-१८३७ अंतर्गत रु.१५ लक्षचे काम मंजूर करण्यात आले आहे. तसेच सदर रस्त्याच्या संपूर्ण लांबीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणाचे काम सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील बोर्डी ते नागापूर मार्गे अकोट या रोडचे काम मागील काही महिन्यांपासून बंद असल्याबाबत

**(१५) ४२२४२ (०७-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मागील दोन वर्षांपासून सुरु असलेले अकोला जिल्ह्यातील बोर्डी ते नागापूर मार्गे अकोट या रस्त्याचे काम मागील काही महिन्यांपासून बंद असल्याने वाहनधारकांना त्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रोडचे काम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१), (२) व (३) अकोला जिल्ह्यातील रामा-२८१ ते वसाली नागापूर या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत नसून मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत मंजुर आहे.

सदर रस्त्याच्या कामाचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर सुरूवातीलाच पावसाळा तद्नंतर माहे फेब्रुवारी, २०२० पासून कोविड-१९ च्या महामारीमुळे झालेले लॉकडाऊन व या दरम्यान बांधकाम साहित्य व मजुरांची अनुपलब्धता तसेच तद्नंतर अकोला जिल्ह्यामध्ये झालेली अतिवृष्टी व लांबलेला पावसाळा यामुळे कामाची निर्धारित प्रगती साध्य करता आली नाही. सद्यस्थितीत सदर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पुर्ण झालेले असून केवळ ३०० मी. लांबीचे सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे व रोड फर्निचरचे काम प्रगतीत आहे

---

**सोनखेड (ता. लोहा, जि. नांदेड) हे गाव सीसीटिव्हीपासून वंचित असल्याबाबत**

**(१६) ४२४१९ (०१-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनखेड (ता. लोहा, जि. नांदेड) या सर्वात मोठी व सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीला शासनाच्या दुर्लक्षामुळे सीसीटिव्हीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर गावात सीसीटिव्ही तातडीने लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही .

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही .

---

**सोलापूर जिल्हापरिषदेच्या १०५ कोटी रुपयांच्या निधीस अद्यापही प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याबाबत**

**(१७) ४२७२१ (२४-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेचे काम सद्यस्थितीत खूपच संथगतीने सुरू असून जिल्हा नियोजन समितीकडून (डी पी डी सी ) जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण, लघुपाटबंधारे आणि बांधकाम विभागाकडील तब्बल १०५ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला, असून त्यास अद्यापही प्रशासकीय मान्यता मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याने अनेक विकासाची कामे अपूर्ण असून निधीला अद्यापही प्रशासकीय मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त विभागाच्या निधीस प्रशासकीय मान्यता देऊन विकास कामे त्वरीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील डोंगरगाव येथे जाण्यासाठी रस्त्याच्या पक्क्या बांधकामाबाबत**

**(१८) ४२९६२ (३०-०३-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) तालुक्यातील डोंगरगाव येथे जाण्यासाठी ५ कि.मी. पक्का रस्ता नसल्याने या गावातील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी जाण्यासाठी तसेच पावसाळयात दुचाकी वाहन, मोटार सायकल सुध्दा जाण्यासाठी प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावातील नागरिकांनी उक्त कारणासाठी सन २०१९ च्या विधानसभा निवडणूकीवर १०० टक्के बहिष्कार घातला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन डोंगरगाव येथील पक्का रस्ता बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सदर रस्त्याचे काम आशियाई विकास बँक बॅच-२ अंतर्गत मंजुर आहे. सदर रस्त्याच्या सबग्रेडचे काम पुर्ण झाले असून ३ नळकांडी पुलांची कामे पुर्ण झाली आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरच्या रस्त्याचे उर्वरित काम लवकरात लवकर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे. श्रीक्षेत्र रामदास पठार (ता.महाड, जि.रायगड) हे गाव तिर्थक्षेत्र स्थळ घोषित करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१९) ४३७९२ (०९-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे. श्रीक्षेत्र रामदास पठार (ता.महाड, जि.रायगड) या गावास तिर्थक्षेत्र स्थळाचा दर्जा मिळण्याबाबत माजी लोकप्रतिनिधी (महाड विधानसभा) यांनी दिनांक १४/०२/२००६ रोजी वा त्यासुमारास मा. पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माजी लोकप्रतिनिधी यांनी दिनाक २९/०९/२००६ रोजी मौजे रामदास पठार, ता. महाड हे गाव पर्यटन स्थळ / तिर्थक्षेत्र स्थळ म्हणून रायगड जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेसाठी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास कार्यकारी अभियंता (बांधकाम), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग ह्यांनी दिनांक ०६/१०/२०१० रोजी जिल्हा नियोजन अधिकारी रायगड – अलिबाग यांना सदर पर्यटन क्षेत्र हे ‘’क’’ दर्जा म्हणून घोषित केले असून यासाठी पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत मान्यता व निधी मिळण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास दिनांक १३/०२/२०१२ रोजी पर्यटन क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत मा. कार्यकारी अभियंता (बांध), रा.जि.प. अलिबाग यांजकडे जा.क्र./राजिप/बाखा/आस्था-२/३०५/१२ दि.१३/०२/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कार्यकारी अभियंता (बांध), रा.जि.प. अलिबाग दिनांक १३/१२/२०१२ रोजी अंदाजपत्रकिय रक्कम १ कोटी ५० लक्ष रुपयाचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती रायगड/अलिबाग यांस सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२८-०६-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, रायगड यांनी सदर क्षेत्र ‘क’ वर्ग पर्यटन क्षेत्र घोषित केलेले नाही. तथापी, कार्यकारी अभियंता (बांधकाम), रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी मान्यता व निधीची विनंती केली आहे, हे खरे आहे.
(६) मौजे रामदास पठार, ता. महाड सुशोभीकरणाचा रू. १.११ कोटी रक्कमेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीपुढे सादर करण्यात आला होता. तथापि, सदर क्षेत्र ‘क’ वर्ग पर्यटन स्थळ/ तिर्थक्षेत्र नसल्यामुळे मान्यता देण्यात आली नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जि.पुणे, (ता.हवेली) अंतर्गत अहिरे गावासाठी रस्ता उपलब्ध नसल्याबाबत**

**(२०) ४४९६१ (०७-१०-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिरे (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत गावासाठी हक्काचा रस्ता उपलब्ध नसल्याचे माहे, मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिरे गाव हे ७१ कुटुंबांचे जवळपास ३५० लोकसंख्या असलेले गाव असून सध्या या गावासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मधून रस्ता असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील ग्रामस्थांना दैनंदिन गरजांच्या दळणवळणासाठी अनेक अडचणी येत असतांना जिल्हाधिकारी प्रशासनाकडे पत्रव्यवहार करुन देखील अद्यापर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने अहिरे गावासाठी स्वतंत्र रस्ता उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) व (२ ) अंशत: खरे आहे.
अहिरे गावठाणा अंतर्गत वाड्या वस्त्यांना जोडणारा अहिरे खाडेवाडी हा रस्ता रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र.४०४ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची लांबी ६ कि.मी. असून त्यापैकी सा.क्र.०/०० ते ३/०० मधील ३ कि.मी. लांबी राष्ट्रीय सुरक्षा प्रबोधिनी (NDA) च्या अखत्यारित आहे.
(३) व (४) राष्ट्रीय सुरक्षा प्रबोधिनी (NDA) च्या अखत्यारित असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्याकरीता जिल्हा परिषदेने राष्ट्रीय सुरक्षा प्रबोधिनी (NDA) यांना विनंती केली आहे. परवानगी मिळाल्यानंतर व निधीच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे काम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भगवतीपूर (ता.राहाता,जि.अहमदनगर) येथील आरोग्य उपकेंद्रामधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२१) ४५३५९ (११-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भगवतीपूर (ता.राहाता,जि.अहमदनगर) येथे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नातून बांधलेल्या उपकेंद्रात अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्त्या प्रलंबित असल्यामुळे परिसरातील सुमारे ६ हजार लोकसंख्येसाठी बांधलेले आरोग्य केंद्र मागील तीन वर्षांपासून विनावापर असल्याने परिणामी रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना उपचारासाठी १० ते १२ कि.मी. दूर जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपकेंदात इमारत उभी आहे परंतु आरोग्य समुदाय अधिकारी, आरोग्य सेवक, अर्धवेळ परिचारिका व मदतनीस ही पदे मागील तीन वर्षांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपकेद्रातील रिक्त पदे भरण्याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही. कोल्हार-निंबे वस्ती (भगवतीपूर) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाले असून इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. सदर उपकेंद्रासाठी पदनिर्मितीस दि.७.६.२०२१ च्या शासन निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे. सदर गावापासून प्राथमिक आरोग्य केंद्र कोल्हार ४ कि.मी. व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र लोहगाव ४ कि.मी. असल्याने सदर गावातील नागरिकांस या आरोग्य संस्थांमधून आरोग्य सेवा देण्यात येत आहेत. तसेच, कोल्हार- निंबे वस्ती (भगवतीपूर) येथे आरोग्य सेवा पुरविणे कामी उपकेंद्र लोहगाव येथील आरोग्य सेविका यांची प्रतिनियुक्ती केलेली आहे. लसीकरण सत्राची सुविधा सदरच्या उपकेंद्रातून देण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे. शासन निर्णय दि.७.६.२०२१ अन्वये सदर उपकेंद्रास आकृतीबंधानुसार आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व अंशकालीन स्त्री परिचर ही ३ पदे मंजूर आहेत. सद्यस्थितीत सदर पदे रिक्त आहेत. तात्पुरत्या स्वरुपात कोल्हार- निंबे वस्ती (भगवतीपूर) येथे आरोग्य सेवा पुरविणे कामी उपकेंद्र लोहगाव येथील आरोग्य सेविका यांची प्रतिनियुक्ती केलेली आहे.

(३) या विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदेंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या दि.२१.१०.२०२२ व दि.१५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला होता. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस./ आय.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्यात आला असून त्यानुषंगाने Application Portal विकसित करुन लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापूर तालुक्यातील सांगवी (काटी) ते पांगदरवाडी या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाची उंची वाढविण्याबाबत

**(२२) ४६३४९ (२५-०९-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगवी (काटी )पांगदरवाडी (ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद) या दोन गावांना जोडणाऱ्या पुलाची उंची वाढवून काम सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक १३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गापासून सांगवी हे गाव केवळ एक कि.मी. अंतरावर असून गावाच्या ओढ्यावर सुमारे तीस वर्षांपूर्वीचा भूमिगत पुल आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सांगवी माळुंब्रा साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यावर अतिरिक्त पाणी सांडव्याद्वारे वाहून जाणाऱ्या पाण्यामुळे सदरहू पुल अनेक वेळा पाण्याखाली जात असल्याने सांगवी (काटी) व पांगदरवाडी या दोन गावांचा संपर्क तुटल्याने जनतेस मोठ्या संकटास तोंड द्यावे लागते हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन यावर कोणती ठोस उपाययोजना राबविणार आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१) व (२ )होय,हे खरे आहे.
(३) व (४) पांगदरवाडी व सांगवी परीसरात पावसाळयात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानंतर सांगवी माळूंब्रा साठवण तलाव पुर्ण क्षमतेने भरल्याने Causeway वरून जादाचे पाणी वाहत असल्याने काही काळ रस्ता बंद असतो. मात्र पावसाचा जोर कमी झाल्यानंतर तसेच इतर वेळी सदर पुलावरून दळणवळण सुस्थितीत चालु राहते.सद्यस्थितीत पुलावरून वाहतूक वर्दळ विनाअडथळा सुरळीत चालू आहे. सदर ठिकाणी असलेला Causeway सुस्थितीत आहे. या ठिकाणी उंच पुलाची आवश्यकता असून येथे ३० किमी लांबीचा पूल बांधणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजित १८० लाख खर्च अपेक्षित असुन प्रस्तुत पुलासंदर्भात भविष्यात निकषानुसार प्रस्तावित होणाऱ्या कार्यक्रमांतर्गत प्राधान्याने समाविष्ट करण्याच्या प्रयत्न करण्यात येईल.

---

## मलकापुर (जि.बुलढाणा ) तालुक्यातील पंतप्रधान घरकुल पपत्र नमुना "ड" मधील यादीत वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांना पुन्हा यादीत समाविष्ट करण्याबाबत

**(२३) ४६५२० (०९-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापुर, (जि.बुलढाणा ) तालुक्यातील पंतप्रधान घरकुल पपत्र नमुना "ड" मध्ये अकरा हजार लाभार्थ्यांची नांवे मंजूर असून अनेक लाभार्थ्यांची नावे वगळण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यादीमध्ये वगळण्यात आलेली नावे पुन्हा यादीत समाविष्ट करण्यात यावी तसेच घरकुलांची अनुदानीत रक्कम वाढवून मिळावी अशी मागणी होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) : (**१) होय.

(२) होय.

(३) राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत "प्रपत्र ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.०९/०४/२०२१ व दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून या संदर्भात पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तद्नंतर मा.लोकप्रतिनिधी कडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. अद्यापपर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून प्राप्त नाहीत.

तसेच दिनांक २५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये घरकुलाची रक्कम वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दि. ०२.१२.२०२० च्या पत्रान्वये अशी कोणतीही वाढ करता येत नाही असे कळविले आहे. त्यानंतर सुध्दा शासनाकडे वेळोवेळी प्राप्त झालेल्या संदर्भाच्या अनुषंगाने दि. ०१.०८.२०२२ च्या पत्रान्वये घरकुलाची रक्कम वाढवून मिळणेबाबत केंद्र शासनास पत्र पाठविले असून केंद्र शासनाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रशाद (PRASHAD) योजनेंतर्गत तुळजापूर (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील तुळजाभवानी तिर्थक्षेत्राचा विकास करण्याजबाबत**

**(२४) ४६५८७ (१७-०९-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे तुळजाभवानी मंदिरात धार्मिक उत्सव व दर्शनासाठी देशातील सर्व राज्यातून लाखो भाविक येत असून या तिर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालय अंतर्गत तीर्थक्षेत्र कायापालट अध्यात्म संवर्धन मोहिम (PRASAD) योजनेमध्ये समावेश करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक २०.०१.२०२२, ०७.०१.२०२२, १३.१२.२०२१, १३.१०.२०२१, २१.०९.२०२१, ३०.०८.२०२१, १२.०८.२०२१ व २०.०७.२०२१ रोजींच्या पत्राद्वारे लेखी मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन क्षेत्रांच्या विकासाकरिता सदर PRASAD योजनेच्या माध्यमातून पर्यटन वाढीसाठी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, पर्यटन क्षेत्राबाबत जागरुकता वाढविणे, कौशल्य विकास करणे, रोजगार निर्मिती करणे, पर्यटन वाढविण्यासाठी क्षमता निर्माण करणे, पर्यटकांना मुल्यवर्धित सेवा पुरविणे, पर्यटन स्थळांमध्ये खाजगी क्ष्ेत्राचा सहभाग वाढविणे व एकात्मिक विकास आराखड्याच्या माध्यमातून परिसर विकसित करणे या बाबी अंतर्भूत केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पर्यटन संचालनालयाकडून मागविण्यात आलेला सविस्तर अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालच्या अनुषंगाने PRASAD योजनेत तुळजापूर मंदिर तिर्थक्षेत्राचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१४-०६-२०२३) :**(१) तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास करण्यासाठी केंद्रशासनाच्या 'प्रसाद' योजनेमध्ये समाविष्ट करण्याबाबत लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात आली आहे.

(२) होय.
(३) नाही.
(४) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी श्री तुळजाभवानी मंदिर परिसराचा साईट मॅनेजमेन्ट प्लॅन तयार करण्यासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती केली असून सदर कामांमध्ये ‘प्रसाद’ योजनेचा आराखडा समाविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कुक्कटपालन हा शेतीपुरक व्यवसाय समजून ग्रामपंचायतीमार्फत आकारण्यात येणारी घरपट्टी व इतर कर माफ करण्याबाबत

**(२५) ४७५५६ (१०-११-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कुक्कटपालन हा शेतीपुरक व्यवसाय समजून ग्रामपंचायतीमार्फत आकारण्यात येणारी घरपट्टी व इतर कर माफ करण्याची मागणी कुक्कटपालकांनी केली असल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीची दखल घेत नागपूर विभागातील पशुसंवर्धन अतिरिक्त आयुक्तांनी तसा प्रस्ताव ग्रामविकास विभागास पाठविण्यात यावा अशी शिफारस पशुसंवर्धंन खात्याच्या सचिवांकडे केली आहे, हे ही खरे काय ,
(३) असल्यास, सदरील शेतीपुरक व्यवसाय म्हणून मोठ्या प्रमाणावर शेतकरी कुक्कटपालनाकडे वळाले असून विदर्भात पोल्ट्री व्यवसायाचे हब म्हणून अमरावती जिल्हा नावारुपास आला, हे ही खरे काय,
(४) असल्यास, शेतजमिनीवरच कुक्कटशेड उभारुन हा व्यवसाय केला जात असल्याने स्थानिक ग्रामपंचायतीकडून शेतीपुरक व्यवसाय म्हणून कुक्कटपालनास सर्व स्थानिक करातून वगळण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आल्या आहेत ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३०-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याबाबत आयुक्त,पशुसंवर्धन पुणे, यांच्या प्रस्तावानुसार कृषि व पदुम विभागाने ग्राम विकास विभागास प्रस्ताव दि.१०/११/२०२२ रोजी पाठविला आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५)महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम,१९६० मध्ये शासन अधिसूचना दिनांक ३१ डिसेंबर,२०१५ अन्वये सुधारणा करण्यात आली असुन, सदरच्या अधिसूचनेबाबत पुनश्च: नव्याने सुधारीत बदल किंवा रद्य करण्याबाबत विचारधारणा केल्यास महाराष्ट्र राज्यातून विविध संघटना सहकारी क्षेत्रामार्फत कर माफी बाबीं बाबत मागणी होऊ शकेल याचा परिणाम ग्रामपंचायतींच्या उत्पनावर व प्रशासनावर होईल. मालमत्ता कर हा ग्रामपंचायत उत्पन्नाचा प्रमुख आर्थिक स्त्रोत असुन, ग्रामपंचायतीपुढे आर्थिक पेच निर्माण होऊ शकतो. याकारणास्तव “राज्यात कुक्कटपालन हा शेतीपुरक व्यवसाय समजून ग्रामपंचायती मार्फत आकारण्यात येणारी घरपट्टी व इतर कर माफ करण्याबाबत” आकारण्यात येणारी घरपट्टी व इतर मालमत्ता कर रद्य करणे उचित होणार नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड ( जि.यवतमाळ ) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) ४७६६४ (११-१०-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त पदांमुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात खर्चिक उपचार करुन घ्यावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तालुका आरोग्य अधिकारी तसेच बहुतांशी कर्मचारी मुख्यालयी राहत नसून ते बाहेरच्या जिल्हयातून कामकाज करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२२-०६-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२), (३) व (४) तालुका आरोग्य अधिकारी व काही कर्मचारी वगळता इतर सर्व कर्मचारी मुख्यालयी राहतात. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ यांचे दि.१३.०५.२०२२ च्या पत्रान्वये तालुका आरोग्य अधिकारी, उमरखेड यांना त्यांच्या अधिनस्त सर्व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबत सक्त सुचना करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि. पालघर) येथील पंचायत समितीची नवीन प्रशासकीय इमारत बांधणेबाबत**

**(२७) ४७७०९ (१०-११-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि. पालघर) येथील पंचायत समितीची मुख्य इमारत नादुरुस्त व धोकादायक असल्याने ती नव्याने बांधण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १८/०२/२०२२ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समिती, वसई यांच्या मासिक सर्वसाधारण सभेमध्ये मोडकळीस आलेली इमारत निर्लेखन करुन नविन प्रशासकीय इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने इमारतीचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१) होय,

(२) होय,

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती, वसई (जि. पालघर) येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाबाबत परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे एक वर्ष होऊनही मानधन मिळाले नसल्याबाबत**

**(२८) ४७७१८ (१०-११-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील १०२५ ग्रामपंचायतीपैकी ४३३ ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे एक वर्ष होऊनही मानधन मिळाले नसल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मानधन अद्यापपर्यंत न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सरपंचाचे मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०६-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील १०२५ ग्रामपंचायतींपैकी ६० ग्रामपंचायतींच्या सरपंचांना मानधन अदा केले नसल्याचे मार्च, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील १०२५ ग्रामपंचायतींपैकी ६० ग्रामपंचायतींपैकी ३७ ग्रामपंचायतींमधील सरपंचांचे मानधन एप्रिल, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ अखेरपर्यंत अदा करण्यात आलेले आहे. परंतू उर्वरीत २३ ग्रामपंचायतींपैकी १६ ग्रामपंचायतींमधील सरपंचांची पदे रिक्त असल्याने, ४ ग्रामपंचायतींमधील सरपंचांचे बँक अकाऊंट अवैध असल्याने, २ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक असल्याने आणि १ ग्रामपंचायतीतील सरपंच पदां संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याच्या करणास्तव मानधन अदा करण्यात आलेले नाही.

(३) कोल्हापूर जिल्ह्यातील उर्वरीत ६० ग्रामपंचायतींच्या सरपंचांना मानधन एप्रिल, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ अखेरपर्यंत अदा करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ग्रामिण रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२९) ४७९२७ (०७-११-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये सन २०१९ ते २०२१ या सालामध्ये झालेल्या ढगफुटीसदृष्य पावसामुळे व महापुरामुळे जिल्हयातील रस्ते, पुल, इमारती इ.पायाभूत सुविधांची तसेच कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील इतर जिल्हा मार्ग व ग्रामिण मार्गांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रत्यांच्या दुरुस्तीकरीता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांनीअपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, यांचेकडे दिनांक १३.०९.२०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते दुरुस्तीला आपत्ती व्यवस्थापन निधीमधून निधी देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, आपत्ती व्यवस्थापन मंत्री यांच्याकडे दिनांक ०३.०३.२०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आढळून आले आहे, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०१९ च्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत रु.४०० लक्षची कामे करण्यात आलेली आहेत.

माहे जुलै, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता महसूल व वन विभाग (मदत व पूनर्वसन) मार्फत केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना रु.२३१.७४ लक्ष इतका निधी महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१६.०२.२०२३ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.

तसेच ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत दि.३०.०३.२०२२ व दि.३१.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये रु.१२.११ कोटीच्या कामांना जिल्हा परिषदेस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती देवरुख (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३०) ४८०८१ (०७-११-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती देवरुख (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील बांधकाम विभागातील शाखा अभियंत्यांची ९ पदे मंजूर असून त्यातील ८ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदरहू संगमेश्वर हा तालुका दूर्गम व डोंगराळ असल्याने या विभागात विकास कामांचे प्रस्ताव करण्यासाठी तसेच सुरु असलेल्या कामांवर देखरेख करण्यास बांधकाम विभागाकडे मुनष्यबळाची कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बांधकाम विभागातील रिक्त असलेली कनिष्ठ अभियंत्यांची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

बांधकाम उपविभागातील एकुण ९ मंजूर शाखा अभियंता पदांपैकी ०१ पद कार्यरत असून ८ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे आहे.

तथापि, ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील २ शाखा अभियंता हे बांधकाम उपविभाग, देवरूख येथे कार्यरत असून, तालूक्यातील एकूण १२६ ग्रामपंचायतीचे कामकाज कार्यरत बांधकाम उपविभागातील ०१ शाखा अभियंता व कामगिरीवर कार्यरत असलेले ०२ शाखा अभियंता असे एकुण ०३ शाखा अभियंता यांच्याकडे सद्यास्थिती विभागून देण्यात आले आहे.

(३) उपरोक्त संवर्गातील एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के रिक्त पदे भरण्याकरीता ग्रामविकास विभागाच्या दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद रत्नागिरी मधील आरोग्य विभागातील रिक्त पदांबाबत**

**(३१) ४८०८२ (०७-११-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभागात एकूण १०४९ पदांपैकी ३९६ पदे रिक्त आहेत हे खरे आहे काय.

(२) असल्यास, रिक्त पदांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण पथक, प्रशासन अधिकारी, सांख्यिकी अधिकारी, जिल्हा विस्तार अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माता, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका इ. महत्वाची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे सर्वसामान्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. त्याचबरोबर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रचंड प्रमाणात ताण पडतो आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास,सदरहू पकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२३-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) उपरोक्त संवर्गापैकी आरोग्य विभागाशी संबंधित गट-क संवर्गातील सर्व रिक्त पदे तसेच इतर संवर्गातील एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के रिक्त पदे भरण्याकरिता ग्रामविकास विभागाच्या दि.२१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कौशल्य विकास सोसायटीशी संलग्नित प्रशिक्षण संस्थांना मिळणारा निधी अपूरा असल्याबाबत**

**(३२) ४८८९८ (१२-१०-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कौशल्य विकास सोसायटीशी संलग्नित प्रशिक्षण संस्थांना शासनाकडून निधी दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या माहितीनुसार कौशल्य विकास सोसायटीच्या माध्यमातून प्रशिक्षित कुशल मनुष्यबळ निर्माण केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थांना देण्यात येणारा निधी अपुरा असून त्याची प्रक्रिया किचकट असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०५-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे. प्रशिक्षित कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी राज्य तसेच केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी कार्यालयास निधी देण्यात येतो. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्यमिता मंत्रालयाद्वारे Common Norm Policy अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या प्रती उमेदवार प्रती तास याप्रमाणे Pro-rata तत्वावर राज्यातील सूचिबद्ध संस्थांना प्रशिक्षण कार्यक्रमासाठी टप्पेनिहाय प्रशिक्षण शुल्क महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येते. कौशल्य विकास सोसायटीशी संलग्नित प्रशिक्षण संस्थांना शासनाकडून निधी दिला जात नसून सदर निधी प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत संबंधित प्रशिक्षण संस्थांना करण्यात येते.
(३) व (४) हे खरे नाही. केंद्र व राज्य शासनाचे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे सूचीबद्ध असलेल्या प्रशिक्षण संस्थांमार्फत राबविण्यात येतात. प्रशिक्षण संस्था सुचीबद्धता आणि प्रशिक्षण कार्यक्रमाची बहुतांश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीची आहे. सदर प्रक्रियेच्या कार्यपध्दती संबंधित पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबविणाऱ्या प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती टप्पेनिहाय पध्दतीने अदा करण्यात येते. पहिल्या टप्प्याचे देयके प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर पहिल्या ७ दिवसाच्या आत उमेदवारांच्या उपस्थितीनुसार, मूल्यमापन व प्रमाणकीकरण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्याचे देयक तसेच,

रोजगार/स्वयंरोजगार दिल्यानंतर शेवटच्या टप्प्याचे देयके संबंधित प्रशिक्षण संस्थामार्फत सादर करण्यात येते. सदर प्रक्रियेच्या कार्यपध्दती संबंधित पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील जिल्हा परिषद बांधकाम विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केलेल्या रस्त्यांच्या कामांना मंजूरी देवून देयके काढून घेतल्याबाबत**

**(३३) ४९१५८ (०७-१०-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद बांधकाम विभागाने सन २०१७ ते २०२२ या कालावधीत ३०५४ अनुशिर्षाअंतर्गत अनेक ग्रामीण रस्ता नसलेल्या गावांतील रस्त्यांना व ५०५४ अंतर्गत अस्तित्वात नसलेल्या जिल्हा रस्त्यांना व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केलेल्या रस्त्यांच्या कामांना मंजूरी देवून देयके काढून घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर प्रकरणी, नियमबाह्य कामांना मंजूरी देवून तसेच ठेकेदारांशी संगनमताने देयके काढून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकारी व अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त माहितीनुसार सन २०१९ - २०२० या कालावधीत ठाणे जिल्हा परिषदेकडील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गावरील एकूण ३४०.९७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर रस्त्यांची दर्जोन्नती करतांना जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता जिल्हा परिषदेचे रस्ते दर्जोन्नत केल्यामुळे याबाबत जिल्हा परिषद, ठाणे अनभिज्ञ होती. तसेच सदर रस्ते दर्जोन्नत होण्यापूर्वीच त्यापैकी काही रस्त्यांच्या कामांना जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता दिली होती. तथापि रस्त्यांच्या दर्जोन्नतीनंतर जिल्हा परिषदेद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीच्या नविन इमारतीचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(३४) ४९४६९ (१६-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) पंचायत समितीच्या नविन इमारतीचे काम अनेक वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे प्रशासकीय काम करताना कर्मचारी व नागरिकांना अनेक अडचणी येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. महेंद्रा रिलेटर्स अँड डेव्हलपर्स कांदिवली या ठेकेदाराला प्रशासकीय भवनाबरोबर ३३ टक्के वाणिज्य वापरासाठी बांधा-वापरा-हस्तांतर करा या (बीओटी) तत्वावर जागा देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समितीची मूळ इमारत बांधून पूर्ण करायची अशी अट असताना संबंधित ठेकेदाराने दोन्ही इमारतीचे काम एकाच वेळी सुरू केल्याने सदर इमारती लगत असलेल्या झोपडपट्टीमुळे वाणिज्य गाळे विकले न गेल्याने इमारत उभारणीचे काम गेल्या अनेक वर्षापासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०७-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे,
(३) होय, अंशत: खरे आहे,
(४) चौकशीकामी जिल्हा परिषद स्तरावर सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) सुकाणू समितीचा निर्णय अद्यापही अप्राप्त आहे.

---

**मौजे मुर्तवडे-वारेली-कातळवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करून वारेली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत**

**(३५) ४९६०९ (२०-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मुर्तवडे-वारेली-कातळवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन करून वारेली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे तसेच मौजे तळघर-अणसपुरे (ता. खेड) या ग्रुप ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून सन २०१७ पासून सातत्याने पत्राद्वारे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार मुर्तवडे-वारेली-कातळवाडी ग्रामपंचायत विभाजनाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत ग्रामपंचायतीला कळविण्यात आले आहे. तथापि, ग्रामपंचायत स्तरावरुन अद्याप प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

मौजे तळघर-अणसपुरे (ता. खेड) ग्रामपंचायत विभाजनाचा प्रस्ताव शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ मधील लोकसंख्येच्या निकषात बसत नसल्याने अमान्य करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या उमेद अभियांनास प्रोत्साहन देण्याबाबत**

**(३६) ४९९३१ (२१-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील ७१ लाख गरीब कुटूंबांना शाश्वत उपजिविकेच्या माध्यमातून गरीबीतून बाहेर काढण्यासाठी राज्य शासन राबवित असलेली "उमेद अभियान" योजना सद्यस्थितीत प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अभियांन योजनेला काही भागात प्रशासकीय अधिकारी व बँकांकडून महिला स्वयंसहायता समुहांना वेठीस धरीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी महिलांना अनेक हेलपाटे मारुनही त्यांची कामे व अभियांनाचे उद्दीष्ट साध्य होत नसल्याने सदर अभियान राबविणे बंद करण्याची मागणी अखिल भारतीय क्रांतीसेना करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने अभियांनाला प्रोत्साहन देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) होय, अखिल भारतीय क्रांतीसेना पक्ष यांनी दिलेल्या पत्रानुसार जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर तसेच तालुका अभियान व्यवस्थापक तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, जि.अहमदनगर यांना स्वयंसहाय्यता समुहांना बँक कर्ज उपलब्ध करुन देणेबाबत व अडचणी बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी अनुक्रमे दिनांक ०३.११.२०२२ व दिनांक १४.११.२०२२ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राहुरी तालुक्यातील कोंढवड येथील १५ स्वयंसहाय्यता समूहांपैकी ११ पात्र स्वयंसहाय्यता समूहांना HDFC बँकेद्वारे कर्ज वितरण करण्यात आले असून उर्वरित पात्र समूहांना कर्ज वितरण करण्याची प्रक्रिया चालू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात दरवर्षी परंपरागत दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा देणे व शासकीय नोकऱ्यात दहीहंडी खेळणाऱ्या गोविंदांना आरक्षण देण्याबाबत

**(३७) ५००३३ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दरवर्षी परंपरागत दहीहंडीला साहसी खेळाचा दर्जा देणे व शासकीय सेवेत (नोकऱ्यांत) दहीहंडी खेळणाऱ्या गोविंदांना आरक्षण देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी जाहीर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दहीहंडी खेळणाऱ्या गोंविंदांना शासकीय सेवेत आरक्षण देण्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) :** (१) व (२) शासन निर्णय, दि. २४ ऑगस्ट, २०१६ नुसार मानवी मनोरे उभारावयाच्या प्रकारास (खेळास) साहसी खेळाचा दर्जा देण्यात आलेला आहे. दहीहंडीमधील अपघातग्रस्त गोविंदांना आर्थिक मदत करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. १७ ऑगस्ट, २०२२ रोजी घोषणा केली. त्याअनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय, दि.१८.०८.२०२२ मधील तरतूदीनुसार अपघातग्रस्त गोविंदांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत देण्यात आली आहे. तथापि, दहीहंडी खेळणाऱ्या गोविंदाना शासकीय सेवेत नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा निर्णय झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोईसर (ता. डहाणू) ग्रामपंचायतीच्या नावाने दाखले बनवून करोडो रुपयांचा आर्थिक घोटाळा झाल्याबाबत**

**(३८) ५०३७६ (२४-०१-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. बोईसर (ता.डहाणू, जि. पालघर) ग्रामपंचायती अंतर्गत सन २०१५ मध्ये दांडीचा पाडा-काटकर पाडा येथील ग्रामस्थांच्या नावाने गावठाण जागेसाठी बनावट ७ दाखले ग्रामपंचायतीकडून देण्यात आल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू ग्रामपंचायतीच्या दफ्तरी तसेच आवक-जावक रजिस्टरमध्ये उक्त दाखल्यांची कोणतीही नोंद नसल्याचे तसेच देण्यात आलेल्या गावठाण दाखल्यांसाठी ग्रामपंचायतीचे लेटरहेड, शिक्के आणि तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्याची बनावट स्वाक्षरी करुन सन २०१७ मध्ये परप्रांतीय नागरिकांना प्रतिगुंठा ४ लाख रुपये प्रमाणे विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी चौकशी करुन त्याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा असे मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती.डहाणू यांना आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित गटविकास अधिकारी, डहाणू यांचेकडून त्याबाबतचा अहवाल प्राप्त होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

बोईसर (ता. जि.पालघर) ग्रामपंचायत अंतर्गत सन २०१५ मध्ये दांडीचा पाडा, काटकरपाडा येथील ग्रामस्थांच्या नावाने गावठाण जागेसाठी बनावट ७ दाखले ग्रामपंचायतीकडून देण्यात आल्याचे वृत्त दिनांक ६.१०.२०२२ रोजी दैनिक पुढारी या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झालेले आहे. परंतु सदरचे बनावट दाखले हे ग्रामपंचायतीकडून दिलेले नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

सन २०१७ मध्ये बनावट लेटरहेड व शिक्यांचा वापर करुन खरेदी विक्रीच्या व्यवहाराची दस्तनोंदणी झालेबाबत दुय्यम निबंधक पालघर २ यांचेकडील कागदपत्रावरुन दिसून येते.

(३) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणात संबंधितावर नियमानुसार कारवाई करण्याबाबत गटविकास अधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले आहे. यानुषंगाने ग्रामपंचायत बोईसर यांनी जा.पं.२४०२, दिनांक ०६.०१.२०२३ रोजी पोलिस निरीक्षक, बोईसर पोलिस स्टेशन यांना चौकशी करण्याकरीता पत्र दिले आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी सुरु असून पालघर येथील दिवाणी न्यायाधीश, पालघर न्यायालयात नियमित दावा क्र.५८/२०२२ दाखल असून न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हातील अर्जुनी/मोरगाव विधानसभा क्षेत्रातील इटखेडा. महागाव कोरंभी व इसापुर ग्रामपंचायतीत सव्वा दोन कोटीचा आर्थिक अपहार झाल्याबाबत**

**(३९) ५०४४४ (२०-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हातील अर्जुनी/मोरगाव विधानसभा क्षेत्रातील इटखेडा, महागाव, कोरंभी व इसापुर ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक यांनी सव्वा दोन कोटीचा आर्थिक अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी ग्रामसेवक यांना दिनांक २३ जून, २०२१, रोजी वा त्यासुमारास निलंबित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीत कॅशबुक, धनादेश इतर महत्वाचे दस्ताऐवज गहाळ झाल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानसुार संबंधित ग्रामसेवकावर बडतर्फीची कारवाई करुन अपहार केलेल्या रक्कमेची वसुली करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे .
(३) होय, हे खरे आहे .
(४) प्रस्तुत प्रकरणाच्या प्राथमिक चौकशी मध्ये श्री. व्हि.एस. श्रीवास्तव, ग्रामसेवक यांनी इटखेडा, महागाव, कोरंभी व इसापूर ग्रामपंचायतीचे दस्तऐवज कार्यालयात न ठेवल्याचे तसेच रु.२,२५,९१,१६१/- एवढया शासकीय निधीचा अपहार केल्याची बाब प्रथमदर्शनी निदर्शनास आली आहे. अपहार झालेल्या रकमेच्या वसुली प्रकरणी श्री. व्हि. एस. श्रीवास्तव, तत्कालिन ग्रामसेवक यांच्यावर FIR दाखल करुन अटक करण्यात आली असल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील बालेवाडी क्रिडा संकुलात “ऑलिंपिक भवन” बांधकामाबाबत

**(४०) ५०६५५ (२१-०१-२०२३) :**सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात क्रिडा संस्कृतीची जोपासना व विकासासाठी ‘ऑलिंपिक भवन’ पुणे जिल्ह्यातील बालेवाडी क्रिडा संकुलात बांधणेसाठी आवश्यक निधी राज्य शासनाने क्रिडा विभागास उपलब्ध करून दिला आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदरहू क्रिडा संकूल बांधणीसाठीचा निधी उपलब्ध करून दोन वर्षापेक्षा अधिकचा कालावधी होवनूही उक्त बांधकामाकरीता सार्वजनिक बांधाकाम विभागाकडुन ठेकेदार नेमण्याबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने ऑलिंपिक भवन बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाकाकडून एजन्सी नेमण्या संदर्भातील निर्णय तात्काळ निर्णय घेण्यासाठी तसेच उक्त क्रिडा संकुलात ऑलिंपिक भवनचे बांधकाम सुरू करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) : (**१) होय,
(२) व (३) क्रीडा विभागाला बांधकामासाठी रू.४४.७० कोटी निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

क्रीडा संचालनालयाने दि. १७.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये ऑलिम्पिक भवन बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एजन्सी नियुक्त करणे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी वर्ग करणे, याअनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सबब, चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४१) ५०७१७ (२०-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आरोग्य सेवक व सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माता, आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गातील ६६८ पदाबरोबर तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची ३२७ अशी एकूण ९९५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे केव्हांपासून रिक्त आहेत व ती रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रिक्त पदांचे प्रमाण जास्त असल्याने जिल्हयातील आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे सदर पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन दिनांक ०१/०८/२०१४ रोजी पालघर जिल्ह्याची नव्याने निर्मिती झालेली आहे. जिल्हा निर्मिती पासून नियमित पदभरती झालेली नसल्याने तसेच कर्मचारी सेवा निवृत्त /स्वेच्छा सेवा निवृत्त/ मयत /पद्दोन्नती इत्यादी कारणामुळे मोठ्या प्रमाणात पदे रिक्त झालेली आहेत.

(३) पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आरोग्य सेवक व सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, आरोग्य पर्यवेक्षक , या संवर्गातील रिक्त असणारी पदे भरण्याची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फ़त सुरू होती. तथापि विभागाच्या २१/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये सदरची पद भरती रद्द करण्यात आलेली असून सदर पदभरती नव्याने जाहिरात मागवून पदभरती करण्याबाबत जिल्हा परिषद यांना निर्देश देणेत आलेले आहेत. त्यानुसार पदभरती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी शहरातील भोईवाडा पोलीस स्टेशनसाठी जागा हस्तांतरित करण्याबाबत

**(४२) ५०९८० (२०-०१-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील भोईवाडा पोलीस स्टेशन साठी जागा हस्तांतरित करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे मा. लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिळकत क्र. ५०,५१,५२ तालुका लोकल बोर्ड यांच्या नावे असलेली जागा हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त ठाणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडे दिनांक २९ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, सदर जागेत पंचायत समिती, भिवंडी यांचेकडील गटविकास अधिकारी, उप अभियंता यांची निवासस्थाने व गोडाऊन इत्यादी इमारती अस्तित्वात आहेत. मात्र सद्यस्थितीत निवासस्थाने नादुरुस्त असून निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्त करुन वापरण्यात येतील. सदर जागा पंचायत समिती,

भिवंडी करिता आवश्यक असल्याने भिवंडी शहरातील भोईवाडा पोलीसस्टेशन साठी जागा हस्तांतरित करणेचे प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुरात जिल्हा क्रीडा संकुलाची निर्मिती तातडीने होणेबाबत**

**(४३) ५१०४५ (१८-०१-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्याची क्रीडा नगरी अशी ओळख असून विविध खेळांची परंपरा लाभलेल्या कोल्हापुरात जिल्हा क्रीडा संकुलाची निर्मिती तातडीने होणे गरजेचे असल्याने कोल्हापूर शहराजवळील शेंडा पार्क येथील २५ एकर जागा उपलब्ध करण्यासाठी शासन स्तरावर तात्काळ कार्यवाही व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदृअनुषंगाने क्रीडा संकुलासाठी त्वरित जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) :**(१) होय.
(२) जिल्हा क्रीडा संकुल, कोल्हापूर या संकुलाची उभारणी करण्याकरीता क्रीडा विभागाकडून कोल्हापूर शहराजवळील शेंडापार्क येथील गट क्र.६०० ते ६०२ येथील कृषी विभागाची २५ एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे मागणी केलेली आहे. तथापि, जागा अद्याप क्रीडा विभागास प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत लहुरी (ता.केज, जि.बीड) येथे विविध कामात झालेल्या अपहाराची चौकशी करणेबाबत**

**(४४) ५११६३ (२०-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लहुरी (ता.केज, जि.बीड) येथील ग्रामपंचायती अंतर्गत विविध कामात सरपंच व ग्रामसेवक यांनी केलेल्या अपहाराची चौकशी करणेबाबत अध्यक्ष, संभाजी बिग्रेड यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना दिनांक ०५/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागणी केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे .
(२) प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांनी मा उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ येथे रिट याचिका क्र.३९६०/२०२२ दाखल केलेली आहे. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाचे आदेशपावेतो कोणतीही कार्यवाही करुन नये, असे मा. उच्च न्यायालयाने सूचित केले आहे. सबब, सदर प्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी समितीचे चौकशी अहवाल मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल करण्यात आले असून मा. न्यायालयाच्या प्राप्त होणाऱ्या पुढील आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत काडीवडगाव (ता.वडवणी, जि.बीड) या अंतर्गत पुर्नवसीत काडीवडगाव क्रं.२ (दुसरा टप्पा) बाबत**

**(४५) ५१३४१ (२१-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काडीवडगाव (ता.वडवणी, जि.बीड) येथील ग्रामपंचायत अंतर्गत पुर्नवसीत काडीवडगाव क्रं.२ (दुसरा टप्पा) मधिल जागेवर प्लॉटींग काढुन बेकायदेशीर रित्या विक्री केल्यामुळे संबंधीतावर कायदेशीर कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक. १५.०९.२०२२ रोजी वा त्या सुमारास गट विकास अधिकारी, पंचायत समिती वडवणी (जि.बीड) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय त्यानुसार संबंधीत दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय ,सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असुन प्रकरणातील दोषी व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालू आहे.

---

**राज्यातील १४ जिल्हा सुरक्षा मंडळातील कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या वेतनवाढ व अन्य मागण्यांबाबत**

**(४६) ५१४२५ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ जिल्हा सुरक्षा मंडळात कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या वेतनवाढीचा करार २ वर्ष होऊनही प्रत्यक्षात वेतनवाढ करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वेतनवाढ व इतर मागण्यांबाबत सुरक्षा मंडळातील सुरक्षा रक्षकांनी माहे फेब्रुवारी-मार्च २०२२ तसेच माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुरक्षा रक्षकांच्या मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०२/११/२०२२ च्या पत्रान्वये मंत्री, कामगार यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू सुरक्षा रक्षकांच्या मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१५-०६-२०२३) :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) दि.०२.०५.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये राज्यातील १२ जिल्हा कार्यरत सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्ते यामध्ये वाढ करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील गट "क" च्या १८ संवर्गातील भरती करण्याबाबत**

**(४७) ५१६२८ (२४-०१-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :**सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील गट "क" च्या १८ संवर्गातील १३ हजार ५१४ पदे ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी महाआयटी मार्फत मार्च, २०१९ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा आल्याचे कारण पुढे करून १९ सप्टेंबरला शुद्धिपत्रक काढत पुन्हा परिक्षा आणि वेळापत्रकाला स्थगिती देऊन दिनांक २१ ऑक्टोबरला पुन्हा शासन निर्णय काढून ही भरतीच रद्द करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भरती प्रक्रिय रद्द करण्यात आल्याने ११ लाख २८ हजार अर्जदारांचे परीक्षा शुल्क पुन्हा परत देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर भरती प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२०-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदे अंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या अनुक्रमे दि.२१ ऑक्टोबर, २०२२ व दि.१५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला होता. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस. / आ.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावर आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर Application Portal विकसित करून लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने शौर्य पुरस्कार सुरु करण्याबाबत**

**(४८) ५१६८१ (२१-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने शौर्य पुरस्कार सुरु करण्याची घोषणा सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती ,हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरील पुरस्कार सुरु करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही शासनामार्फत करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-०५-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर पुरस्काराच्या अनुषंगाने नियमावली अंतिम करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड (जि. रायगड) तालुक्यात माहे २०२२ मध्ये झालेल्या महापुरात /अतिवृष्टीमुळे ग्रामीण रस्त्यांच्या व साकवांच्या दुरुस्तीस निधी मिळणेबाबत

**(४९) ५१७२४ (२०-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि. रायगड) तालुक्यात माहे जुलै ते सप्टेंबर, २०२२ मध्ये झालेल्या महापुरात ग्रामीण रस्त्यांची व साकवांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त रस्त्यांच्या व साकवांच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या व त्यावरील पुलांच्या दुरुस्तीसाठी शासनाने दि.०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अतिवृष्टी व पुरहानी कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४-२९११) ही नवीन योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेंतर्गत वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त रस्त्यांच्या/पुलांच्या दुरुस्तीकरिता जिल्हा परिषदांना निधी वितरीत करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दि रेल्वे गुड्स क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड मधिल अधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर करून नियमबाहय आदेश पारीत केल्याबाबत

**(५०) ५५७७५ (२१-०१-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथाडी कायदा आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २१.०१.२००९ च्या शासन निर्णयाचा अवलंब न करता २/३ (दोन तृतीयांश) कामगारांनी संमती दिलेली नसतानाही टोळी क्र.१९५ मधील इतर कामगारांवर अन्याय करत सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, रेल्वे गुडस् क्लिअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड, मुंबई यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून दिनांक ७.७.२०२२ रोजी जा.क्र.आर.एल. बी.९३८/२०२२ द्वारे आदेश पारीत करत भ्रष्टाचाराच्या माध्यमातून टोळी क्र.१९५ मधील श्री.खुर्शिद मुराद बेग रजि. क्र.१२१७३ यांची टोळी क्र.२५० व श्री.सदाशिव पुकळे, श्री.रमेश नांगरे यांची आर अँड डी विभागात रूजू करण्याबाबत आदेश निर्गमित केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
दि रेल्वे गुड्स ॲण्ड क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्डमध्ये नोंदीत टोळी क्र. २५० मधील मे. राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि. चेंबूर, मुंबई आस्थापनेत कार्यरत एकूण २/३ पेक्षा जास्त माथाडी कामगारांनी संमती दिल्याने दिनांक २१.०१.२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार मंडळाने टोळी क्र.१९५ मधील कामगार श्री.खुर्शीद बेग याला टोळी क्र. २५० मध्ये तात्पुरत्या स्वरूपात काम करण्याकरीता दिनांक ०७.०४.२०२२ रोजीच्या आदेशाद्वारे बदली दिलेली आहे.

तसेच, टोळी क्र.१९५ मधील श्री.सदाशिव पुकळे व श्री.रमेश नांगरे यांना मंडळाने दि. २९.०६.२०२० रोजीच्या आदेशान्वये जिप्सम प्लांन्ट बंद झाल्यामुळे बेकार झाले असल्याने नेमून दिले असता रूजू करून न घेतल्याने सदर टोळीतील कामगारांनी रूजू करून घेण्याबाबत मंडळाने दिनांक ०७.०४.२०२२ रोजीचा आदेश निर्गमित केले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.